# लोक महाविद्यालय, वर्धा

## राष्ट्रीय सेवा योजना

### अहवाल

### सत्र २०१४-१५

महाविद्यालयाला सत्र २०१४-१५ करीता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापिठाने १५० विद्यार्थ्यांचे पथक मजुंर केलेले आहे. त्यांमध्ये ८३ मुली व ६७ मुले यांची या सत्रामध्ये नोंदणी करण्यात आली.

राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये रितसर अर्ज भरून विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात आली व राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकाचे उद्घाटन करण्यात आले. त्या कार्यक्रमाला लोक शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. डॉ. गजाननराव कोटेवार प्रमुख अतिथी मा. श्री. संजय नाखले महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पुष्पा तायडे उपस्थीत होत्या. प्राचार्यांनी स्वयंसेवकांना शपथ दिली व मान्यवरांनी समयोचित मार्गदर्शन केले. दि. ११ जुलै २०१४ ला जागतिक लोकसंख्या दिनांचा कार्यक्रम घेण्यात आला. त्या कार्यक्रमाला प्राचार्या मा. डॉ. पुष्पा तायडे यांनी मार्गदर्शन केले.

रविवार दि. १० ऑगष्ट २०१४ ला स्वातंत्र्यदिनांच्या पुर्वी महाविद्यालयाच्या परीसराची साफसफाई व स्वच्छता करण्यात आली. व श्रमदानानंतर बौध्दिक कार्यक्रम घेण्यात आले. त्यामध्ये श्री. चिवके स्वप्ना यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. सुनील पाटणे उपस्थीत होते.

दि. १२ ऑगष्ट २०१४ ला आंतरराष्ट्रीय युवा दिनांचा कार्यक्रम घेण्यात आला. एच. आय. व्ही/ एड्स च्या जनजागृतीसाठी, पोस्टर स्पर्धा, चित्रकला स्पर्धा तसेच घोषणा स्पर्धाचे आयोजन करण्यात आले. सामान्य रूग्णालयात वर्धाच्या वतीने या कार्यक्रमाला सहाय्य करण्यात आले.

दि. १५ ऑगष्ट २०१४ ला स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थीत होते. झेंडा वंदनाच्या कार्यक्रमानंतर स्वयंसेवकांची सभा घेण्यात आली व राष्ट्रीय सेवा योजनेच्या पुढील कार्यक्रमावर विचार विनीमय करण्यात आला.

दि. २० ऑगष्ट ते ५ सप्टेंबर या काळात सद्भावना पंधरवाड्याचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी स्वयंस्फुर्त प्रतिसाद दिला.

दि. ५ सप्टेंबर २०१४ ला डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पूष्पहार अर्पण करण्यात आला व स्वयंसेवकांनी सर्व शिक्षकांना गुलाब पुष्प देऊन नमन केले.

दि. ८ सप्टेंबर २०१४ ला आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाचे आयोजन करण्यात आले त्याप्रसंगी प्राचार्या मा. डॉ. पुष्पा तायडे यांनी मार्गदर्शन केले. दि. २४ सप्टेंबर २०१४ ला राष्ट्रीय सेवा योजना दिनाचे आयोजन करण्यात आले.

दि. ०२ आक्टोबर २०१४ ला जागतिक अहिंसा दिनांचे आयोजन करण्यात आले. त्याप्रसंगी महाविद्यालयाची साफसफाई करण्यात आली. व उपविभागीय अधिकारी वर्धा, यांनी सार्वत्रिक निवडणुकांची मतदार जनजागृती करण्यासाठी रॅलीचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये महाविद्यालयाच्या ५० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला व मतदाराना मतदानाचे आवाहन करण्यात आले.

दि. १ डिसेबंर २०१४ ला जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून सामान्य रूग्णालय वर्धा च्या सहायाने H-I-V  एड्स जनजागृती विषयक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यामध्ये

तज्ञ डॉक्टरांनी मार्गदर्शन केले. नोबल शिक्षण संस्था त्या कार्यक्रमाच्या प्रायोजक होत्या. त्यांप्रसगी संचालिका सौ. शेंडे व महाविद्यालयाच्या प्राचार्या सौ. डॉ. पुष्पा तायडे यांनी मार्गदर्शन केले.

दि. १० डिसेंबर २०१४ ला मानवधिकार दिनाचे आयोजन करण्यात आले. त्यांप्रसगी संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. गजाननराव कोटेवार यांनी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले.

दि. १२ जानेवारी २०१५ ला युवा दिनाचा कार्यक्र घेण्यात आला त्याप्रसंगी स्वामी विवेकानंदाच्या जिवन कार्यावर प्रा. डॉ. विलास भिमनवार यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा महाविद्यालयाच्या प्राचार्या सौ. डॉ. पुष्पा तायडे होत्या.

दि. . १६ जानेवारी ते २० जानेवारी २०१५ या कालावधीमध्ये विशेष श्रम संस्कार शिबीराचे आयोजन करण्यात आले. हे शिबीर नरसाई माता मंदीर आंजी येथे घेण्यात आले. शिबीराच्या उद्घाटन समारंभ दि. १७ जानेवारी २०१५ ला झाला. संस्थेचे सचिव श्री. प्रकाश शोयर यांच्या अध्यक्षतेखाली व श्री. जगदीश संचारीया सरपंच आंजी यांच्या विशेष उपस्थीत तसेच संस्थेचे सहसचिव प्रा. सजय कोटेवार महाविद्यालयाच्या प्राचार्या सौ. डॉ. पुष्पा तायडे होत्या शिबीर कालखंडामध्ये आंजी येथे स्वच्छता, व शौचालय बांधकाम व वापर यांचा प्रचारासाठी विशेष रॅलीचे आयोजन करण्यात आले. त्याच प्रमाणे जि. प. वर्धा च्या स्वच्छता व पाणी पुरवठा विभागाच्या मार्गदर्शनानि सर्वेक्षणाचे काम करण्यात आले. त्यासाठी श्री. विनोद खोब्रागडे व सचिन खाडे, यांनी समन्वयकांची भुमीका पार पाडली. विशेष श्रम संस्कार शिबीरामध्ये विविध क्षेत्रातील मान्यवर समाजसेवक व वक्त्यांनी शिबीरार्थीना मार्गदर्शन केले. त्यामध्ये प्राचार्य अशोक मेहरे, बाबासाहेब वेले, डॉ. लक्ष्मीकांत झोडे, प्रा. विवेक सामवंशी, प्रा. गोपाल हेलोंडे, सौ. अर्चना वानखडे, इत्यांदीनी बौध्दिक सत्रात मार्गदर्शन केले.

दि. २१ जानेवारी २०१५ ला समारोप कार्यक्रम पार पडला. त्या कार्यक्रमाला अध्यक्ष डॉ. गजाननराव कोटेवार व प्रमुख वक्ते प्राचार्य डॉ. माहेश्वरी उपस्थीत होते.

दि. २२ जानेवारी २०१५ ला शिबीर स्थळावरुन महाविद्यालयाकडे प्रस्थान करण्यात आले. दि. २५ जाने. २०१५ ला महाविद्यालयाची स्वच्छता करण्यात आली व बौध्दिक सत्र घेवुन समारोप करण्यात आला.

दि. २६ जानेवारी २०१५ ला स्वयंसेवक झेंडावंदनसाठी मोठया संख्येने उपस्थीत होते.

दि. ३१ जानेवारी २०१५ ला महात्मा गांधी पुण्यतिथी कार्यक्रमातंर्गत स्वच्छ भारत अभियान राबविण्यात आले. त्याप्रसंगी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी वर्धा शहरामध्ये स्वच्छतेचे कामे केली. व गांधीजीना श्रध्दाजली अर्पण केली. वरील सर्व कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या प्राचार्या सौ. डॉ. पुष्पा तायडे संस्थेचे अध्यक्ष गजाननराव कोटेवार व्यवस्थापक मडंळाचे पदाधिकारी, कर्मचारी वर्ग या सर्वाचे वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य लाभल्यामुळे आम्हाला सर्व कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडता आले.

Principal,
L... Mahavidyalaya
WARDHA.

प्रा. मोहन सोनुरकर
प्रा. शत्रुघ्न मानकर
कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
लोक महाविद्यालय, वर्धा

# लोक महाविद्यालय, वर्धा

## राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष श्रमसंकार शिबीर २०१४ -१५

# अहवाल

**स्थळ :- नरसाईमाता मंदीर देवस्थान आंजी (मोठी)**

**दि. १६ जानेवारी ते २२ जानेवारी २०१५**

**स्वयंसेवक - ३१, स्वयंसेविका -४४, एकूण ७५**

लोक महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि. १६ जानेवारी ते २२ जानेवारी २०१५ या कालावधीमध्ये नरसाई माता मंदरी आंजी (मोठी) येथे आयोजीत करण्यात आले होते. दि. १६ जानेवारीला शिबीर स्थळी आगमन दि. १७ जानेवारी २०१५ ला शिबीराचे औपचारिक उद्घाटन सकाळी ११.०० वा करण्यात आले. कार्यक्रम अध्यक्ष म्हणुन लोकशिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव श्री. प्रकाशराव भोयर तर उद्घाटक डॉ. शिरीष गोडे अध्यक्ष स्काऊट गाईड वर्धा जिल्हा प्रमुख अतिथी श्री. जगदीश संचरिया सरपंच आंजी (मोठी) महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पुष्पा तायडे संस्थेचे सहसचिव प्रा. संजय कोटेवार उपस्थीत होते. सर्व सन्माननीय व्यक्तींनी शिबीरार्थींना समयोचित मार्गदर्शन केले. सेवेची व श्रमाची संस्कृती जोपासण्याचे आवाहन केले. शिबीरामध्ये जि. प. वर्धाच्या स्वच्छता व पाणिपुरवठा विभागाने काही मार्गदर्शक सूचना दिल्या होत्या त्या दृष्टीने शिबीराची रुपरेषा तयार करण्यात आली होती. संडास बांधकाम व वापर स्वच्छता व आरोग्य असे मुख्य उद्देश डोळ्यासमोर ठेवून शिबीराची तयारी करण्यात आली होती. दि. १७/०१/२०१५ ला बौध्दिक सत्रामध्ये दु. २.०० वा. श्री. विनोद खोब्रागडे यांचे गाव व स्वच्छता या विषयावर व्याख्यान झाले. तसेच दु. ३.०० श्री. सचिन खाडे यांनी शौचालय बांधकाम व वापर या विषयावर व्याख्यान देऊन शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली.

शिबीराच्या नियोजीत कार्यक्रम पत्रिकेनुसार सायकाळी ४.०० ते ६.०० या वेळात खेळ सायकाळी ७.०० ते ८.०० या वेळात सास्कृतिक कार्यक्रम ८.०० ते ९.०० जेवन व नंतर दैनंदिन कामकाजाचा आढावा व पुढील दिवसाचे नियोजन करून रात्री ११.०० वा. लाईट बंद झोप घेतली जायची. सकाळी ५.०० वाजता शिबीरार्थी विद्यार्थी प्रांतविधी करून सकाळी ६.०० वाजता मैदानावर योगा व प्राणायामा करीता येत असे. व त्यानंतर चहा नाश्ता करून स. ८.०० ते ११.०० पर्यंत श्रमदान केले जायचे.त्यानंतर विद्यार्थी स्नान करून दुपारी १२.०० वाजता भोजन करून दुपारच्या बौध्दिक सत्राला हजर होत असे. असे ७ दिवस सर्व विद्यार्थी शिस्तीने वागले व मोठ्या प्रमाणवर श्रमदान व जनजागृती करून शिबीर यशस्वी केले.

दि. १८/०१/२०१५ ला बौध्दिक सत्रामध्ये दुपारी २.०० वाजता प्रा. अशोक मेहरे व दुपारी ३.०० वाजता प्रा. बाबासाहेब वेले यांनी विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणा व श्रमाचे महत्व यावर मार्गदर्शन केले.

दि. १९/०१/२०१५ ला बौध्दिक सत्रामध्ये दुपारी २.०० वाजता डॉ. लक्ष्मीकांत झोडे वैद्यकिय अधिकारी आजी व दुपारी ३.०० वाजता प्रा. विलके सोमवंशी यांनी आरोग्य व युवक या विषयावर मार्गदर्शन केले.

दि. २०/०१/२०१५ ला बौध्दिक सत्रामध्ये दुपारी २.०० वाजता प्रा. गोपाल हेलोंडे यांनी शिबीराची यशस्वीता या विषयावर मार्गदर्शन केले. व दुपारी ३.०० वाजता अर्चना मुडे-वानखडे यांनी तरुणाई व चारित्र्य या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दि. २१/०१/२०१५ ला सकाळी विशेष श्रमसंस्कार शिबीराचा समारोपीय कार्यक्रम आयोजीत करण्यात आला. त्या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून लोक शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. डॉ. गजाननराव कोटेवार तर प्रमुख अतिथी माजी प्राचार्य मा. डॉ. माहेश्वरी जानकी देवी बजाज विज्ञान महाविद्यालय, वर्धा संस्थेचे सहसचिव मा. प्रा. संजय कोटेवार, माजी प्राचार्य प्रा. अमृतराव येऊलकर मा. प्राचार्या पुष्पा तायडे मा. उपप्राचार्य सुनिल पाटणे मंचावर उपस्थीत होते. शिबीराच्या यशस्वी अमंलबजावणीचे कौतूक करून सर्व शिबीरार्थीच्या अभिनंदन केले. समारोप प्रसंगी डॉ. राजीव जाधव, डॉ. विश्वनाथ बेताल, डॉ. अविनाश साहुरकर डॉ. अनिल सुरकार, प्रा. महेंद्र सहारे, इत्यादी प्राध्यापक उपस्थीत होते. शिबीरार्थी विद्यार्थ्यांनी शिबीर दरम्यान आलेले अनुभव कथन करून आपले मनोगत व्यक्त केले व कार्यक्रमाची सांगता झाली.

दि. २२ जानेवारी २०१५ ला सर्व शिबीरार्थींनी शिबीरस्थळाचा भावपूर्ण निरोप घेतला व महाविद्यालयाकडे प्रयाण केले.

महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना महत्वपूर्ण भुमीका पार पाडत असते. विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्व अष्टपैलू होण्यासाठी अशा अभ्यासपूर्ण योजना महत्व पूर्ण असतात. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना येथे वाव मिळतो. भविष्याच्या उभारणीसाठी राष्ट्रीय सेवा योजना आमच्या जीवनात मोलाची भुमीका बजावेल असा आशावाद शिबीरार्थ्यांनी व्यक्त केला.

शिबीर कालावधीमध्ये आयोजीत करण्यात आलेले सास्कृतिक कार्यक्रम अंधश्रध्दा, व्यसनमुक्ती, सामाजिक वाईट चालिरिती, हुडांबळी, बुवाबाजी, वृक्षसंवर्धन, पर्यावरण, स्त्री - पुरुष समानंता स्वच्छता व शौचालयाचा वापर शेतकऱ्यांच्या आत्महत्या ई. विषयावर होते. तसेच वादविवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, पथनाट्य, स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा, इ. मधून मनोरंजन व शिक्षण असा हेतू साध्य करण्यात आला.

राष्ट्रीय सेवा योजनेचे श्रमसंस्कार शिबीर पार पाडण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. गजाननराव कोटेवार, संस्थेचे सचिव मा. श्री. प्रकाश श्रोयर संस्थेचे सहसचिव मा. प्रा. संजय कोटेवार माजी प्राचार्य प्रा. अमृतराव येऊलकर मा. प्राचार्या पुष्पा तायडे मा. उपप्राचार्य सुनिल पाटणे विद्यापिठाचे समन्वयक डॉ. भाऊ दायदार जि. प. वर्धा चा पाणि पूरवठा व स्वच्छता विभाग, महाविद्यालयाचे सर्व सन्माननीय प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी शिबीरार्थी विद्यार्थी व नरसाई माता मंदीर आंजी (मोठी) येथील विश्वस्त श्री. जगदीश बत्रा यांच्या अनमोल सहकार्यामुळे शक्य झाले. विशेष आभार महाविद्यालयाचे कर्मचारी श्री. अन्वर खान व प्रा. राजु धात्रक यांनी सक्रीय सहभाग नोंदवून शिबीर यशस्वी केले.

Principal,
Lok Mahavidyalaya
WARDHA.

प्रा. मोहन सोनूरकर
प्रा. शत्रुघ्न मानकर
कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
लोक महाविद्यालय, वर्धा